# जाहिरात.

## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१९
## नंदुरबार जिल्हा पोलीस दल.

**जाहिरात क्रमांक** **ठिकाण : नंदुरबार.** **दिनांक २३ .०८.२०१९,**

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील तरतुदीनुसार पोलीस अधीक्षक, नंदुरबार यांच्या आस्थापपनेवर सन २०१९ मध्ये जिल्हा पोलीस शिपाई या संवर्गातील रिक्त होणारी २५ पदे भरण्यासाठी जिल्हा पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यांत येत आहे.

**भाग-१ (पोलीस शिपाई)**

| | अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ०२ | ०६ | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०२ | १२ | २५ |
| कप्पीकृतआरक्षण | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०१ | ०७ | १५ |
| महिला३०% | ०१ | ०२ | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०४ | ०८ |
| खेळाडु५% | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| प्रकल्पग्रस्त५% | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| भुकंपग्रस्त२% | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| माजी सैनिक १५% | -- | ०१ | -- | -- | -- | -- | -- | -- | ०१ | ०२ |
| अंशकालीन५% | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| पोलीस पाल्य३% | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| गृहरक्षकदल ५% | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| अनाथ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| एकुण | ०२ | ०६ | ०१ | ०१ | ०१ | -- | -- | ०२ | १२ | २५ |

अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१.१२.२०१९ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यांत आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चीत करण्यांत आलेली आहेत.

ब) अंतिम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यांत येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यांत येवू नये.

क) पदोन्नतीवरील आरक्षणा संदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिका मध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णया विरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिके बाबत होणाऱ्या अंतिम

निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिराती मध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होवू शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी याना पदे भरण्याचा अधिकार आहे.

ड) या कार्यालयाच्या आस्थापनेवर बॅन्ड पथकातील पदे भरतीसाठी उपलब्ध नाहीत.

२) महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस शिपाई या पदासाठी पोलीस शिपाई सेवाप्रवेश नियम - २०११ वेळोवेळी करण्यांत आलेल्या सुधारणासह, (शासन निर्णय क्रमांक जेएएलई-१०१५/१६६६/प्रक्र.३०२/तुरुंग-१, दिनांक १५.०१.२०१६ अन्वये) लागू आहेत. सर्व सेवाप्रवेश नियम सुधारणासह www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर (Home page) वर व (sp.nandurbar@gmail.com) वर उपलब्ध असून ते त्या त्या पदावरील भरतीसाठी आवेदन अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना लागू राहतील.

**महत्वाची टीप :-**

जिल्हा पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबंधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार यांना दुरध्वनी क्रमांक ०२५६४-२३०००९ वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच या संदर्भात उमेदवार पोलीस अधीक्षक या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष पोलीस भरती समिती-२०१९ तथा अपर पोलीस अधीक्षक/पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय) नंदुरबार यांचेशी संपर्क साधून तक्रार करु शकतील. तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयात ०२२-२२२०२३६३७ या दुरध्वनी क्रमांकावरही तक्रार करता येईल.

उमेदवारांना काही अडचण भासल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था/कार्यालयाचे नांव | दुरध्वनी / मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १. | पोलीस अधीक्षक कार्यालय नंदुरबार (कार्यालयीन वेळेत) | ०२५६४-२१०१०१ |

( महेंद्र पंडित, भापोसे.)
पोलीस अधीक्षक, नंदुरबार.